# महाराष्ट्र विधानसभा

## चौथे अधिवेशन, २०१७

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### मत्स्य व्यवसायाचा समावेश औद्योगिक वर्गवारीत न करता कृषी वर्गवारीत करण्याबाबत

**(१) ३९३३ (२२-१२-२०१४). श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अध्यक्ष, वसई मच्छिमार सह.संस्था वसई यांनी दिनांक २४ जून, २०१४ रोजीच्या पत्रान्वये मा.ऊर्जामंत्री यांच्याकडे मच्छिमार व्यावसायाचा औदयागिक वर्गवारीत समावेश न करता कृषी वर्गवारीत (ॲग्रीकल्चर) करावा अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या मागणीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) व (३) मा.विद्युत नियामक आयोग यांचे आदेश दिनांक २६.०६.२०१५ अन्वये मत्स्यव्यवसायाचा समावेश वाणिज्यिक वर्गवारीतून औद्योगिक वर्गवारीमध्ये करण्यात आलेला असून मत्स्य व्यवसायास औद्योगिक दराने वीज आकारण्यात येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### राज्यातील मुंबई व पुण्यात मायक्रोसॉफ्ट या कंपनीसाठी २ डेटा सेंटर उभारण्याबाबत

**(२) ८११२ (१०-०४-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.सदा सरवणकर (माहिम) :** सन्माननीय **उदयोग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मुंबई व पुण्यात मायक्रोसॉफ्ट या कंपनीला २ डेटा सेंटर उभारण्यासाठी शासनाने परवानगी दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे किती प्रमाणात रोजगार उपलब्ध होणार आहेत,
(३) असल्यास, सदर डेटा सेंटर उभारण्याच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे वा त्यानुषंगाने सुरु असलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई (१४-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) मायक्रोसॉफ्ट कंपनीने डेटा सेंटर उभारणीसाठी स्वस्त दराने जागा व वीज उपलब्ध करुन देण्याबाबतची विनंती महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास केलेली आहे. मायक्रोसॉफ्ट कंपनीस पुणे, नाशिक, औरंगाबाद, बुटीबोरी येथील जागेबाबतची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली आहे. कंपनीने डेटा सेंटर उभारणीबाबतचा अंतिम निर्णय अद्याप महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास कळविलेला नाही. माहिती व तंत्रज्ञान सहाय्यभूत सेवा धोरण-२०१५ मध्ये डेटा विकसित करण्याचा समावेश आहे. अद्याप मायक्रोसॉफ्ट कंपनीसोबत निर्णय झालेला नाही.

---

## धुळे तालुक्यात विद्युत वितरण कंपनीकडे रोहित्रांचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत

**(३) १६५१६ (१०-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के.सी.पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे तालुक्यात विद्युत वितरण कंपनीकडे रोहित्रांचा तुटवडा असल्याने शेतक-यांना नादुरुस्त रोहित्रांमुळे जलसिंचनासाठी अडचणी निर्माण होत असून यासाठी ६३ के.व्ही क्षमते ऐवजी १०० के.व्ही क्षमतेचे रोहित्र लावण्याबाबत मा.राज्यमंत्र्यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी निवेदन दिल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७) :**(१) व (२) महावितरण कंपनीच्या धोरणात्मक निर्णयानुसार ६३ के. व्ही.ए. क्षमतेचा रोहीत्र नादुरुस्त झाल्यास त्या ठिकाणी १०० के.व्ही.ए. क्षमतेचे रोहीत्र बसविण्यात येते. तसेच वर्ष २०१५-१६ करीता जिल्हा नियोजन समिती अंतर्गत ६३ के.व्ही.ए. ऐवजी १०० के.व्ही.ए. क्षमतेची रोहीत्रे धुळे तालुक्यात मंजूर करण्यात आलेले आहेत. त्यानुसार धुळे तालुक्यात माहे मे, २०१५ अखेर १३ रोहीत्र बसविण्यात आलेले आहेत.
तसेच पायाभूत आराखडा योजना-२ अंतर्गत ६३ के.व्ही.ए. ऐवजी १०० के.व्ही.ए. क्षमतेचे एकूण १४२ रोहीत्रे बसविण्याचे काम प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पोयनाड (जि.रायगड) येथे कन्यादान योजनेअंतर्गत २८ आदिवासी जोडप्यांनी दुहेरी लाभ घेतल्याबाबत

**(४) २०१३८ (३०-०७-२०१५). श्री.धैर्यशील पाटील (पेण), श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.जीवा गावित (कळवण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पोयनाड (जि.रायगड) येथे दिनांक २९ मार्च, २०१५ रोजी झालेल्या सामुहिक आदिवासी विवाह सोहळयात २८ जोडप्यांनी कन्यादान योजने अंतर्गत दुस-यांदा लाभ घेतल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दुस-यांदा लाभ घेणा-या जोडप्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-०८-२०१७) :**(१) हे खरे नाही.

दिनांक २९ मार्च, २०१५ रोजी अध्यक्ष, मूलनिवासी आदिवासी कामकरी समाज विकास संस्था मेढेखार, पो. पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने ३५९ अदिवासी जोडप्यांचा विवाह सोहळा संपन्न झाला. सदर विवाह सोहळ्यात २८ जोडप्यांना कन्यादान योजनेअंतर्गत दुस-यांदा लाभ देण्यात आल्याचे निदर्शनास आले नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात महावितरण कंपनीने मोठ्या प्रमाणात केलेली दरवाढ

**(५) २५५४४ (१०-०८-२०१५). श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात महावितरण कंपनीने मोठ्या प्रमाणात दरवाढ केली असून महावितरण कंपनीचे कर्मचारी मीटरप्रमाणे वीज देयके देत नसल्याने नागरिकांत असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच सदर प्रकरणी मा.उर्जा मंत्री यांना चंदगडचे लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १५ जून, २०१५ रोजी लेखी निवेदन दिल आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७) :**(१) विद्युत अधिनियम, २००३ नुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगास वीज दर ठरविण्याचे अधिकार आहेत. आयोगाच्या दिनांक २६.०६.२०१५ च्या वीज दर आदेशानुसार महावितरण कंपनी ग्राहकांच्या वीज दरात सन २०१४-१५ च्या तुलनेत सरासरी ५.७५ टक्क्यांची कपात झाली आहे. कोल्हापूर परिमंडळातील वीज ग्राहकांचे मीटर वाचन खाजगी एजन्सी मार्फत करण्यात येते व मीटर वाचनानुसार वीज देयके देण्यात येतात.

(२) संबंधित लोकप्रतिनिधींनी दिनांक ०२.०५.२०१५ रोजी निवेदन दिलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आटपाडी (जि.सागंली) येथे विद्युत तारांच्या ठिणग्या पडून शेतकऱ्यांचे नुकसान झाल्याबाबत**

**(६) २५६६७ (१०-०८-२०१५). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आटपाडी तालुक्यामधील (जि.सांगली) आटपाडी येथे दिनांक २४ एप्रिल, २०१५ रोजी विद्युत तारांच्या ठिणग्या पडुन अक्षय प्रकाश साळुंखे या शेतकऱ्यांची डाळींब बाग व ठिबक सिंचनाचे साहित्य जळून नष्ट झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७) :**(१) होय. सदरील घटना ही दिनांक २१.४.२०१५ रोजी घडली आहे.

(२) व (३) सदर घटनेची विद्युत निरिक्षक, मिरज यांच्यामार्फत चौकशी करण्यात आली आहे. दिनांक २१.४.२०१५ रोजी सदर शेतातून जाणाऱ्या ११ केव्ही आटपाडी एजी वाहिनी व ११ केव्ही आटपाडी गावठाण वाहिनी या दोन्ही वाहिन्यांपैकी कोणत्याही वाहिनीवर आटपाडी ३३/११ केव्ही उपकेंद्रात कोणत्याही प्रकारचे ट्रिपींग आले नाही. अपघाताच्या चौकशीवेळी सदर उच्चदाब वाहिन्यांचे जमिनीपासून उभे अंतर (५ मिटरपेक्षा जास्त), वाहिन्यांच्या वाहकामधील अंतर नियमाप्रमाणे व्यवस्थित आढळून आले. सदर दोन्ही उच्चदाब वाहिन्यांवर कोणत्याही प्रकारच्या स्पार्कींगच्या खुणा आढळून आल्या नाहीत तसेच सदर शेतातून जाणारा उच्चदाब वाहिनीचा कोणत्याही फेजचा वाहक तुटल्याचे निदर्शनास आले नाही. डाळींब बागेस लागलेली आग नेमकी विद्युत कारणामुळे लागलेली असल्याचे सिध्द होत नसल्यामुळे नुकसान भरपाई अनुज्ञेय नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी क्रांतीवीरांच्या जयंती व पुण्यतिथीच्या नोंदी नसल्याबाबत**

**(७) २५९८१ (३१-०७-२०१५). श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी क्रांतीवीरांची जयंती व पुण्यतिथी साजरी केली जावी अशी मागणी माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान मा.आयुक्त, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे निवेदनाव्दारे करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी क्रांतीवीरांच्या जयंती व पुण्यतिथीच्या नोंदी शासनाकडे नसल्याची बाब समोर आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०५-०९-२०१७) :**(१) होय.

(२), (३) व (४) आदिवासी क्रांतीकारक हे बहुतांश दुर्गम भागातील असल्याने त्यांच्या जयंती व पुण्यतिथीच्या निश्चित तारखांच्या नोंदीचा शोध घेण्याची कार्यवाही पुराभिलेख संचालनालयामार्फत त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या अभिलेखातून सुरु आहे.

---

**राष्ट्रीय वादळ भय उपशमन प्रकल्प योजनेअंतर्गत भुमीगत केबल द्वारे वीज वितरण व्यवस्था करण्याबाबत**

**(८) २७३५४ (१०-०८-२०१५). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजीच्या निवेदनाद्वारे समुद्रालगतच्या गावांकरीता केंद्रसरकार द्वारा पुरस्कृत राष्ट्रीय वादळ भय उपशमन प्रकल्प योजनेअंतर्गत जमिनीच्या खालून केबल टाकून वीज वितरण व्यवस्था करण्याची मागणी स्थनिक लोकप्रतिनिधींनी मा.उर्जामंत्री यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजीच्या आपल्या पत्रान्वये कळविल्याप्रमाणे व्यवस्थापकीय संचालक, महावितरण ह्यांचा कार्यवाहीचा अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय,

(३) असल्यास, दिनांक २ एप्रिल, २०१४ रोजीच्या पत्रान्वये वसई परिमंडळ अधिका-यांनी राष्ट्रीय वादळ भय उपशमन प्रकल्प योजनेअंतर्गत रु.२० कोटी खर्चाचा प्रस्ताव मा.मुख्य अभियंता महावितरण याच्याकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रस्तावावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७)** :(१) हे खरे आहे.

(२) महाराष्ट्र राज्याच्या सागरी किनाऱ्यालगतच्या चार जिल्हयातील १२ ठिकाणचे प्रस्ताव महावितरण कंपनीने राष्ट्रीय वादळ भय उपशमन प्रकल्प योजनेअंतर्गत सादर केले होते. त्यात वसई मंडळाने सादर केलेल्या सातपाटी येथील प्रस्तावाचा समावेश होता.

(३) व (४) वसई मंडळामार्फत, सातपाटी येथील रु. ११ कोटी ११ लाख खर्चाचा प्रस्ताव मुख्य अभियंता(वितरण) यांच्याकडे सादर करण्यात आला होता. जागतिक बँकेने त्यांच्या दिनांक १०.०७.२०१७ च्या ई-मेल नुसार महाराष्ट्र राज्यातील अलिबाग तसेच रत्नागिरी व सातपाटी येथील सागरी किनाऱ्यांचा समावेश सदर योजनेमध्ये केलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## महावितरणाने सुमारे ४ लाख ५ हजार शेतकऱ्यांच्या कृषि पंपाचा विद्युत भार त्यांची मागणी नसतांना वाढविल्याबाबत

**(९) २७४२९ (१०-०८-२०१५). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कृषि पंपाची हॉर्सपॉवर वाढण्याबाबत राज्यातील कोणत्याही शेतकऱ्यांकडून मागणी नसतांना डिसेंबर, २०११ ते मार्च, २०१२ या चार महिन्यात महावितरणाने सुमारे ४ लाख ५ हजार शेतकऱ्यांच्या कृषि पंपाची एचपी वाढविल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महावितरणाने बेकायदेशीरपणे कृषि पंपाची एचपी वाढवल्याची तक्रार केल्यानंतर उर्जामंत्र्यांनी राज्यातील कृषि पंपाचे थर्डपार्टी ऑडिट करण्याचे आदेश दिले आहेत, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या आदेशानुसार थर्डपार्टी ऑडिटचे काम पूर्ण झाले आहे काय,

(४) असल्यास, त्याचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,

(५) असल्यास, या अहवालानूसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७)** :(१) अशा आशयाचे दिनांक ०७.०५.२०१५ चे निवेदन प्राप्त झाले आहे.

(२), (३), (४) व (५) कृषी ग्राहकांचा प्रत्यक्ष जोडभार आणि कृषी ग्राहकांचा प्रत्यक्ष वीज वापर आणि त्यांना देण्यात येणारी वीज देयके याबाबत सखोल अभ्यास करण्यासाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौ.चिमणगाव बाजापूर (ता.बाभूळगांव, जि.यवतमाळ) येथील शेतकऱ्याला पाठवलेल्या अवास्तव वीज देयकाची चौकशी करण्याबाबत**

**(१०) २७५८३ (१०-०८-२०१५). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौ.चिमणगाव बाजापूर (ता.बाभूळगांव, जि.यवतमाळ) येथे वीज वितरण कंपनीने मीटर वाचनामध्ये चुकीच्या नोंदी करुन रुपये ६३ हजार रुपयांचे वीजेचे देयक देऊन पाणी देयक व वीज चोरीचा ठपका ठेवल्याने श्री.अमरलाल एस. मणियार या शेतकऱ्याचा दिनांक ४ मे, २०१५ रोजी वा त्या सुमारास मृत्यु झाला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्याला पाठविलेल्या वीज देयकाची चौकशी करुन देयक माफ करण्यात यावे अशी मागणी माहे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या आठवड्याच्या सुमारास मा.ऊर्जा मंत्री यांची प्रत्यक्ष भेट घेवून निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) च्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून त्याअनुषंगाने वीज वितरण कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७)** :(१) महावितरण कंपनीच्या अहवालानुसार, दि.०४.०५.२०१५ रोजी श्री.अमरलाल मनिहार वय ८० वर्ष यांचे निधन झाल्याचे वृत्तपत्रात प्रकाशीत झालेल्या बातमीवरुन निदर्शनास येते.

(२), (३) व (४) सदर प्रकरणामध्ये उपकार्यकारी अभियंता, बाभुळगाव उपविभाग तसेच सहायक अभियंता बाभुळगाव शहर वितरण केंद्र यांना निलंबित करण्यात आले. तसेच सदर प्रकरणी महावितरणच्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यास दिरंगाई करणाऱ्या तत्कालीन अधिक्षक अभियंता यांच्यावर सुध्दा निलंबनासारखी कठोर कारवाई करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील यंत्रमाग वीज ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी वीज दराची वेगळी वर्गवारी निर्माण करण्याबाबत**

**(११) २८६६२ (११-०१-२०१६). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील यंत्रमाग वीज ग्राहकांना वीज पुरवठा करण्यासाठी दराची वेगळी वर्गवारी करण्यात आल्याची घोषणा मा. ऊर्जा मंत्री यांनी पावसाळी अधिवेशन २०१५ दरम्यान केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यंत्रमाग वीज ग्राहकांच्या वीज दरातील सवलतीपोटी शासनाकडून महावितरण कंपनीस देण्यात येणारे अनुदान पुन्हा सुरू करण्यासाठी आवश्यक आर्थिक तरतूद करण्याचे

आश्वासन मा. ऊर्जा मंत्री यांनी माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये स्थानिक लोकप्रतिनिधी व यंत्रमाग वीज ग्राहक संघटना यांच्या समवेत झालेल्या बैठकीत दिले आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर तरतूद होईपर्यंत यंत्रमाग वीज ग्राहकांची देयके जुन्या दरानेच भरून घेण्याचा निर्णय सुध्दा सदर बैठकीत करण्यात आला, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रस्तावाची सद्य:स्थिती काय आहे व सदरचा प्रस्ताव केव्हापर्यंत मंजुर होणे अपेक्षित आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७) :**(१) मा.विद्युत नियामक आयोग यांचे वीज दर आदेश दि. २६.०६.२०१५ नुसार लघुदाब यंत्रमाग ग्राहकांसाठी वेगळी उपवर्गवारी निर्माण करण्यात आली आहे.
(२), (३) व (४) वीज नियामक आयोगाच्या जून, २०१५ च्या वीजदराच्या आदेशाच्या अनुषंगाने लघुदाब यंत्रमागधारकाच्या वीज दरासंदर्भात दि.०७/११/२०१५ व दि. ०३/१२/२०१५ शासन निर्णयान्वये सवलती लागू करण्यात आल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मौजे अमडापूर (ता.चिखली, जि.बुलडाणा) येथे महावितरण कंपनीकडून विद्युत पुरवठा सुरळीत करण्याबाबत

**(१२) २९६३५ (२३-१२-२०१५). श्री.राहुल बोंद्रे (चिखली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे अमडापूर (ता.चिखली, जि.बुलडाणा) येथे महावितरण कंपनीकडून विद्युत पुरवठा सुरळीत होत नसल्याने परीसरातील पिके पाण्याअभावी सुकत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शेतकऱ्यांच्या सर्व समस्या मार्गी लावण्यासाठी लोकशाही मार्गाने विज मंडळाच्या विरोधात रस्त्यावर आंदोलन करण्याचा इशारा परीसरातील शेतकऱ्यांनी विद्युत अभियंता यांना लेखी निवेदनाद्वारे महावितरण कंपनीला दिला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी वीज पूरवठा सुरळीत करण्याबाबत दिलेल्या निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७) :**(१) व (२) अमडापूर ३३/११ के.व्ही. उपकेंद्राला पुरवठा करणारी ३३ के.व्ही. वाहिनी अमडापूर ३३/११ के.व्ही. व एकलारा ३३/११ के.व्ही. या दोन्ही उपकेंद्रासाठी एकच आहे. त्यामुळे माहे सप्टेंबर, २०१५ मध्ये ३३ के.व्ही. वाहिनी अतिरिक्त भारामुळे ओव्हरलोड होत होती. त्यामुळे या कालावधीमध्ये दोनही उपकेंद्रावरील काही विद्युत भार ३३/११ के.व्ही. मंगरुळ नवघरे व ३३/११ के.व्ही.एम.आय.डी.सी., चिखली या उपकेंद्रावर

टाकण्यात आलेला होता व अमडापूर व उंद्री परिसरातील कृषी वाहिनींना नियोजनबध्द पध्दतीने दोन भागात विभागणी करुन चक्राकार पध्दतीने वीज पुरवठा देण्यात आलेला होता. त्यामुळे वीज अभावी शेत पिकांचे नुकसान झाल्यासंबंधी महावितरणच्या कार्यालयात कोणतीही तक्रार प्राप्त झालेली नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे निगवे (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथील विद्युतपुरवठा विषयक कामे तातडीने करणेबाबत**

**(१३) ३०५३३ (२३-१२-२०१५). श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे निगवे (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथे विद्युत वाहिन्यांसाठी लावण्यात आलेले खांब जीर्ण झाले असून कोसळण्याच्या स्थितीत असून विद्यूत पुरवठा करण्यासाठी बसविण्यात आलेला डीपी नादुरुस्त असल्याचे माहे ऑगस्ट, २०१५ च्या शेवटच्या आठवडयात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्‌नुसार सदर गावातील डीपी, विद्युत खांब यांसह आवश्यक असलेली विद्युतपुरवठा विषयक कामे तातडीने करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७)** :(१) मौजे निगवे (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथे विद्युत वाहिन्यांसाठी (लघुदाब वाहिनीचे) लावण्यात आलेले काही पोल जीर्ण झालेले आहेत. तथापि विद्युत पुरवठा करण्यासाठी बसविण्यात आलेले डी.पी. सडलेल्या अवस्थेत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) सदर प्रकरणी महावितरण कंपनीने चौकशी केली आहे.

(३) मौजे निगवे (ता.करवीर, जि.कोल्हापूर) येथे विद्युत वाहिन्यांसाठी (लघुदाब वाहिनीचे) लावण्यात आलेले काही पोल जीर्ण झालेले आहेत. O & M (Maintenance) योजनेंतर्गत सदर जीर्ण झालेले ११ पोल बदली करण्याचे काम समाविष्ट करण्यात आले होते. त्यापैकी ५ पोल बदलण्यात आले असून उर्वरित ६ पोल बदलण्याचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच गावातील विद्युत पुरवठा करणारे डी.पी. सुस्थितीत आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जालना जिल्हयातील स्टिल कारखान्यात महावितरण कंपनीचे दिवसाचे वीज दर जास्त असल्याने कामगार एका शिप्टमध्ये काम करत असल्याबाबत**

**(१४) ३५००८ (१३-०१-२०१६).** : सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना जिल्हयातील स्टिल कारखान्यांना महावितरण कंपनीचे दिवसाचे वीज दर परवडत नसल्याने रात्रीचा वेळी एकाच शिप्टमध्ये काम सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जालना शहरातील उद्योगांची स्थिती गंभीर झाल्यामुळे सुमारे ५० हजार लोक बेरोजगार होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या जिल्हयातील उद्योग वाचविण्याकरिता शासनाने कोणती विशेष उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७) :**(१) महावितरण कंपनीच्या मीटर वाचन प्रणालीवरुन असे दिसून येते की, बरेचसे स्टील ग्राहक हे तीनही शिफ्टमध्ये वीजेचा वापर करत असून काही स्टील कंपनी १ किंवा २ शिफ्टमध्ये वीजेचा वापर करीत आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) विदर्भ व मराठवाडयातील उद्योगांना प्रोत्साहन देण्याकरिता शासनाने दि. ०१/०४/२०१६ पासून इंधन समायोजन आकार, उद्योगांच्या कार्यक्षमतेवर आधारित सवलत तसेच नवीन उद्योगांना वीज दरात सवलत लागू केलेली आहे.

---

**बुलडाणा जिल्हयातील शेगाव येथील एका शेतक-यांने कर्जमुक्तीसाठी स्वत:च्या शरीराचे अवयव विक्रीला काढले असल्याबाबत**

**(१५) ३७७५९ (०८-०१-२०१६). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलडाणा जिल्हयातील शेगाव येथील शेतकरी दिलीप भाऊराव देशमुख या शेतक-यांने वरखेड खु. येथील स्वत:च्या शेतामध्ये कर्ज घेवून विहिरीचे बांधकाम करुन कृषी पंपासाठी त्यानी विज वितरण कंपनीकडे रितसर कागदपत्रासह अर्ज केला असता अद्यापही कृषी पंपाचा विज पुरवठा मिळालेला नसल्यामूळे शेती पडीक ठेवावी लागल्याने कर्ज थकले असून त्यामुळे शरीरातील एक किडणी, एक डोळा व जिवंत राहण्यासाठी आवश्यक असलेले अवयव विक्रीला काढले असल्याची माहिती दिनांक ७ नोव्हेंबर २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कृषी पंपाचा विज पुरवठा मिळालेला नसल्यामूळे बागायतीची शेती करू शकलेला नसल्यामूळे सदर शेतक-यावर कर्जाचे हप्ते भरण्यासाठी स्वत:च्या शरीराचे अवयव विक्रीस काढावे लागले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास चौकशीत काय आढळून आले त्या अनुषंगाने संबंधित दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७) :**(१) व (२) दिनांक ०७ नोव्हेंबर, २०१५ रोजी दैनिक तरुण भारत (शेगाव) वृत्तपत्रामध्ये बातमी प्रकाशित झाली आहे.
(३), (४) व (५) सदर शेतकऱ्याने आवश्यक रकमेचा भरणा केल्यानंतर दिनांक ०२.१२.२०१५ रोजी वीज पुरवठा करण्यात आलेला आहे.

---

**मुंब्रा-कौसा (ठाणे) विभागातील वीज भारनियमन रद्द करण्याबाबत**

**(१६) ३८२३० (११-०१-२०१६). ॲड.वारीस पठाण (भायखळा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंब्रा-कौसा (ठाणे) विभागातील वीज भारनियमनामुळे तेथील रहिवाशी विविध समस्यांनी त्रस्त असून मुब्रा, कौसा, शीळ मधील वीज चोरी, गळती व कमी वीज बिल वसूलीचे कारण पुढे करुन एम.एम.ई.सी.एल ने वीज भारनियमन माहे जुलै-ऑगस्ट,२०१५ मध्ये वा त्यादरम्यान सुरु केल्याने विभागीय नागरीक, विविध सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक संघटनांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधींनी यांनी मा.मुख्यमंत्री, मा.मंत्री (उर्जा), मा.राज्यमंत्री (उर्जा) यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे तक्रारी केल्या, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज भारनियमानामुळे लोकांच्या दैनंदिन व्यवहारांवर तसेच शाळेत, कॉलेजात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर याचा दुष्परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, भारनियम व त्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७) :**(१) मुंब्रा-कौसा (ठाणे) परिसरात वीजचोरी, गळती व कमी वीज वसुलीचे कारण पुढे करुन माहे जुलै व ऑगस्ट, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान कोणतेही भारनियमन केलेले नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) मुंब्रा-कौसा विभागातील वीज पुरवठा सुधारण्यासाठी मेक कंपनी येथे २२ के.व्ही. स्वीचींग केंद्र दिनांक १०.०६.२०१७ ला कार्यान्वित करण्यात आले आहे. तसेच १००/२२ के.व्ही. गोटेघर उपकेंद्रातून ८ फिडर्स शिळ करिता प्रस्तावित असून त्यापैकी ३ फिडर्स कार्यान्वित करण्यात आले आहे व उर्वरित काम प्रगतीपथावर आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अनुसूचित जाती-जमातींतील गरजूंना जात दाखला मिळण्यासाठी**
**दिनांक १ मे १९६० हा कार्यकाल ठेवण्याबाबत**

**(१७) ४१८४६ (२८-०४-२०१६). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचीत जाती- जमातीतील गरजूंसाठी शासकीय नोकरी व शैक्षणिक कारणासाठी जात दाखला मिळण्यासाठी सद्यस्थितीत ठेवण्यात आलेला दिनांक १० ऑगस्ट, १९५० हा कार्यकाल रद्द करुन दिनांक १ मे, १९६० हा कार्यकाल ठेवण्यासंदर्भात भारताचे ॲटर्नी जनरल यांचे अभिप्राय प्राप्त झालेले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी प्राप्त झालेल्या अभिप्रायातील शिफारशीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत, तसेच मागासवर्गीय नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी सदर प्रकरणी लवकरात लवकर निर्णय घेऊन त्यांची अंमलबजावणी करण्यासंदर्भात आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (०४-०८-२०१७) :**(१) हे खरे नाही.

अनुसूचित जातीच्या दाखल्याकरिता राज्यातील रहिवासाचा पुरावा दि.१०/८/१९५० असणे ही अट शिथिल करण्यासाठी भारताचे अटर्नी जनरल यांचे अभिप्राय मागविण्यात आले असून सदर अभिप्राय अद्यापि अप्राप्त आहेत.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महिरावणी (जि.नाशिक) येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक शाळेत**
**अनुदानात गैरव्यवहार झाल्याबाबत**

**(१८) ४६६७० (१२-०५-२०१६). श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महिरावणी (जि.नाशिक) येथील सावित्रीबाई फुले माध्यमिक शाळेत शासनाकडून मिळणारे अनुदानात गैरव्यवहार झाला असून विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देण्यापेक्षा बोगस गुणदान देण्याचा गैरप्रकार झाल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(३) तद्नुसार संबंधीत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०५-०९-२०१७) :**(१) हे खरे नाही.
(२) व (३) वर्तमानपत्रातील बातमीच्या अनुषंगाने उपशिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी चौकशी केली आहे. चौकशीत बोगस गुणदान देण्याचा गैरप्रकार आढळून आलेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**अमरावती जिल्ह्यातील कृषी पंपाचा वीज पुरवठा योग्य दाबाने होत नसल्याबाबत**

**(१९) ५०२३४ (२०-०४-२०१६). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मोर्शी व वरुड तालुक्यासहं अमरावती जिल्ह्यातील सर्व कृषी विज पंपाचा विजपुरवठा योग्य दाबाने व पुर्ण वेळ उपलब्ध व्हावा अशी मागणी लोकप्रतिनिधीं दिनांक ११ ऑक्टोबर, २०१५ रोजी मा.ऊर्जा मंत्री यांचेकडे केली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश अधिक्षक अभियंता म.रा.वि.वि.कं. अमरावती यांनी दिनांक ६ जानेवारी, २०१६ रोजी कार्यकारी अभियंता अमरावती ग्रामीण यांना दिले आहेत, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, शेती विज पंपांना नियमित विजपुरवठा उपलब्ध व्हावा यासाठी शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७) :**(१) हे खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) सप्टेंबर ते डिसेंबर या कालावधीमध्ये मोर्शी व वरुड तालुक्यातील कृषी वीज ग्राहकांना योग्य दाबाचा वीज पुरवठा मिळण्यासाठी महापारेषण कंपनीतर्फे नवीन २२० के.व्ही. उपकेंद्र, वरुड व १३२ के.व्ही. भारसिंगी ते वरुड जोड वाहिनीचे काम सुरु आहे. तसेच महावितरणतर्फे दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेअंतर्गत कामे प्रस्तावित आहेत.
(४) महावितरण कंपनीतर्फे दिनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना व आयपीडीएस योजनेअंतर्गत कामे सुरु आहेत. तसेच महापारेषण तर्फे अति उच्चदाब वीज पुरवठा योग्य दर्जाचा मिळावा यासाठी २२० के.व्ही. वरुड उपकेंद्राचे काम मार्च, २०१८ पर्यत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. तसेच १३२ के.व्ही. वरुड व भारसिंगी वाहिनीचे काम डिसेंबर, २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील महाड व पोलादपूर तालुक्यातील आदिवासी शासकीय योजनांपासून वंचित असल्याबाबत**

**(२०) ५४१३६ (१२-०८-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम), श्री.विजय काळे (शिवाजीनगर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील महाड तालुक्यातील ७२ व पोलादपूर तालुक्यातील ३२ आदिवासी वाड्यांना विविध योजनांचा लाभ मिळत नसल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी कुटुंबांना हक्काचे घर, पिण्याच्या पाण्याची सोय, विद्युत पुरवठा, वाडीतील अंतर्गत रस्ते अशा मुलभूत सुविधा अद्यापपर्यंत मिळाल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, आदिवासींना विविध योजनांसाठी पुरावे म्हणून लागणाऱ्या जातीचे दाखले, उत्पन्नाचे दाखले, रेशन कार्ड काढण्यासाठी असणाऱ्या जाचक अटींमुळे आदिवासींना योजनांचा लाभ मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त विभागातील आदिवासी योजनांपासून वंचित राहू नये म्हणून शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) असल्यास, कार्यवाहीचे स्वरूप काय आहे ?

**श्री. विष्णु सवरा (०९-०८-२०१७) :**(१) अशा प्रकारचे महाड-पोलादपूर आदिवासी समाज संघटना, रायगड यांच्या दि.२-०६-२०१६ च्या निवेदनाची प्रत शासनास प्राप्त झाली होती, हे खरे आहे.

(२) उक्त निवेदनाच्या अनुषंगाने प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, पेण कार्यालयामार्फत महाड व पोलादपूर तालुक्यातील वाड्यापाड्यांचे सर्वेक्षण करण्यात आले असता महाड तालुक्यातील बहुतांशी वाड्यापाड्यांमध्ये हक्काचे घरकुल वगळता इतर सुविधा उपलब्ध असल्याचे आढळून आले आहे. तसेच पोलादपूर तालुक्यात देखील या सुविधा उपलब्ध आहेत. महाड व पोलादपूर तालुक्यात विविध घरकुल योजनांद्वारे अनुक्रमे ८९ व ७ लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. तर सन २०१५-१६ व २०१६-१७ साठी महाड व पोलादपूर येथे अनुक्रमे २५ व ७ घरकुले देण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच ठक्कर बाप्पा योजनेंतर्गतही या दोन्ही तालुक्यांमध्ये रस्ते विषयक कामे करण्यात आलेली आहेत.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रायगड जिल्हयातील ग्रामीण व शहरी भागातील अनेक ठिकाणी विजेचे खांब जीर्ण झाल्याबाबत**

**(२१) ५४९०५ (१६-०८-२०१६). श्री.सुभाष उर्फ पंडितशेठ पाटील (अलिबाग), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.धैर्यशील पाटील (पेण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील किनारपट्टी जवळील गावांमधील ग्रामीण व शहरी भागामधील अनेक वीजेचे खांब जीर्ण झालेले असून धोकादायक स्थितीत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कर्नाळा (ता.पनवेल, जि.रायगड) विभागातील लहूचीवाडी, विठ्ठलवाडी, डुंगीचीवाडी, आखाडावाडी आदी चार आदिवासी वाडया आणि कल्हे, चिंचपाडा, व बांधणवाडी या गावांमध्ये चाळीस वर्षापूर्वी टाकलेल्या वीज वाहिनी यंत्रणेद्वारे वीज पुरवठा होत आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या जीर्ण झालेल्या वीजेच्या खांबांमुळे वीज पुरवठा होत असल्याने या ठिकाणी मोठया प्रमाणात जीवीतहानी होण्याची शक्यता असल्याची तक्रार ग्रामस्थांनी वीज वितरण कंपनीकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२२-०८-२०१७) :**(१), (२) व (३) कर्नाळा (ता.पनवेल, जि.रायगड) विभागातील लहूचीवाडी, विठ्ठलवाडी, डुंगीचीवाडी, आखाडावाडी आदी चार आदिवासी वाड्या आणि कल्हे, चिंचपाडा, व बांधणवाडी या गावांमधील १४ जीर्ण झालेले पोल महावितरण कंपनीकडून बदलण्यात आले आहेत.
(४) रायगड जिल्ह्यातील मंडळा अंतर्गत पायाभूत आराखडा-१ ही योजना सन २००८-२०१३ या काळात राबविण्यात आली असून त्या योजनेमधून एकूण ३३०६९ गंजलेले खांब, खराब झालेल्या ५६४.६ किमी उच्चदाब वाहिन्या व १९२.५ किमी लघुदाब वाहिन्या बदलण्यात आलेल्या आहेत. तसेच यु ॲन्ड एम ही योजना सन २०१४-१५ या काळात राबविण्यात आली असून त्याअंतर्गत खराब झालेले ५१५ विद्युत खांब व १२.१ किमी उच्चदाब वाहिनी बदलण्यात आली आहे. उर्वरित कामे दिनदयाळ ग्रामज्योती योजना तसेच आयपीडीएस योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आली आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील राष्ट्रीय महामार्गावरील मद्यविक्री दुकाने हटविण्याबाबत

**(२२) ५६००४ (२०-०८-२०१६). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्गावर मद्यपान करुन वाहने चालवण्यामुळे होणारे अपघात रोखण्यासाठी राष्ट्रीय महामार्गावर मद्यविक्री दुकानांना परवाने न देण्याचे निर्देश केंद्र सरकारने राज्यशासनाला दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, केंद्र सरकारने राष्ट्रीय महामार्गावर मद्यविक्रीस परवाने न देण्याच्या दिलेल्या निर्देशानुसार दारु दुकानांचे परवाने आणि मोटर वाहन कायदा १९८८ ची अंमलबजावणी करण्याबाबत तसेच राज्यातील राष्ट्रीय महामार्गावरील मद्यविक्री दुकाने हटविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०८-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे. तथापि, मा.सर्वोच्च न्यायालयाने याबाबत आदेशीत सुध्दा केले आहे.

(२) मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सर्व राष्ट्रीय/राज्य महामार्गावर मद्यविक्री अनुज्ञप्त्या बंद करण्यात आल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जळगाव जिल्हा परीषदेंतर्गत ५३ गावातील पाणीपुरवठा योजनांना नवसंजीवनी योजनेतून सवलत देण्याबाबत**

**(२३) ५८४३६ (१६-०८-२०१६). श्री.किशोर पाटील (पाचोरा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हा परीषदेतर्गत निर्माण केलेल्या जिल्हाभरातील ५३ गावातील पाणीपुरवठा योजनांची ४ कोटी ४ लाख ९६ हजार ३०३ रुपये वीज देयकांची थकबाकी आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या थकबाकीमुळे या गावामध्ये नव्याने तयार केलेल्या पाणी योजनांना वीज जोडणी मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ५३ पाणी योजनांच्या वीज देयकांना नवसंजीवनी योजनेतून सवलत देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७) :**(१) जळगाव जिल्हा परिषद अंतर्गत पारोळा उपविभागातील ५३ गावाकरिता असलेल्या धुळे बोरी डॅम या पाणीपुरवठा योजनेची रु. १,२७,०३,३९४/- एवढी थकबाकी आहे.

(२) हे खरे नाही.

(३) पेयजल पाणी पुरवठा संजीवनी योजनेमध्ये सदर ग्राहकाने सहभाग घेतला नसल्यामुळे सदर योजनेचा लाभ त्यांना देण्यात आला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उरण तालुक्याला (जि.रायगड) पाणीपुरवठा करणाऱ्या एमआयडीसीच्या जलवाहिन्यांना गळती लागल्याबाबत**

**(२४) ५९३२५ (२२-०८-२०१६). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उरण (जि.रायगड) तालुक्याला पाणीपुरवठा करणा-या एमआयडीसीच्या जलवाहिन्यांना दिनांक २२ मे, २०१६ रोजी वा त्यासुमारास चिर्ले, वायुशक्तीनगर व उरण-पनवेल रस्त्यावरील पेट्रोलपंपाजवळ गळती लागली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरची पाण्याची गळती होण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, यामुळे लाखो लिटर पाणी वाया गेले असून सदर जलवाहिन्यांची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१०-०८-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) जल वाहिनीवरील मेन होलवर लावलेले गोल लोखंडी प्लेटचे वेल्डींग निघाल्यामुळे पाणी गळती झाली.

(३) व (४) जलवाहिनी तात्काळ दुरुस्त करण्यात आलेली आहे.

---

**पुसला (ता.वरुड, जि.अमरावती) येथील पाच घरे विजेच्या तारांमध्ये घर्षण होऊन लागलेल्या आगीत जळून गेल्याबाबत**

**(२५) ६३७७८ (१८-०८-२०१६). डॉ.अनिल बोंडे (मोर्शी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसला (ता.वरुड, जि.अमरावती) येथील पाच घरे विजेच्या **तारांमध्ये** घर्षण होऊन लागलेल्या आगीत पुर्णपणे जळून गेली असल्याचे माहे जुलै, २०१५ रोजी निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या पाच कुटूंबांना शासनाने कोणतीही मदत केली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या ५ घरांना शासनाने तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत लोकप्रतिनिधीं यांनी मा.मुख्यमंत्री यांना दिनांक १२ ऑक्टोबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मागणी केली, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने ५ कुटुंबांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७) :**(१) दिनांक ५.७.२०१५ रोजी जोरदार वादळामुळे लघुदाब वाहिनीच्या तारांमध्ये घर्षण होऊन स्व. देवमन आण्णाजी डोंगरे यांचे घर जळाले असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) आवश्यक कागदपत्रांची पूर्तता न केल्याने महावितरणतर्फे अद्यापपर्यंत त्यांना कोणतीही मदत देण्यात आलेली नाही.

(३) हे खरे आहे.

(४) होय.

(५) स्व. देवमन आण्णाजी डोंगरे यांचे वारसदार म्हणून ५ व्यक्ती आहेत. ग्रामपंचायत पुसला यांचे दाखल्यानुसार सदर घरमालकीच्या हक्कामध्ये ३ व्यक्तीचाच समावेश आहे. तथापि, निराधार झालेल्या कुटुंबाच्या नुकसानीबाबतचे ५ वेगवेगळे पंचनामे सादर करण्यात आलेले आहेत. ग्रामपंचायत, पुसला यांना दाखविलेल्या घर बांधकामाच्या क्षेत्रफळामध्ये तसेच पंचनाम्यातील क्षेत्रफळामध्ये तफावत असल्याने सहायक अभियंता, पुसला यांनी अर्जदाराकडे खुलासा मागितलेला आहे. याबाबत शेंदूरजनाघाट उपविभागाने कंपनीने नेमून दिलेल्या वकीलामार्फत श्री. अंबादास देवमन डोंगरे यांना दि. १७.०४.२०१७ रोजी नोटीस देण्यात आलेली आहे. तसेच तलाठी, मंडळ अधिकारी यांनी सादर केलेले पंचनामे हे परिस्थिती अनुरुप नसल्याकारणाने उपविभागीय अधिकारी (राजस्व) यांना कार्यकारी अभियंता, मोर्शी यांनी दिनांक १३.०६.२०१७ अन्वये खुलासा मागितलेला आहे. सदर खुलास प्राप्त होताच प्रस्तावावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आमगाव (जि.गोंदिया) येथील आंबेडकर चौक ते शासकीय ग्रामीण रूग्णालयापर्यंत पथदिवे लावण्याबाबत

**(२६) ६४०७१ (१८-०६-२०१६). श्री.संजय पुराम (आमगाव) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आमगाव (जि.गोंदिया) येथील आंबेडकर चौक ते शासकीय ग्रामीण रूग्णालयापर्यंत रात्रीच्या वेळेस रूग्ण व नागरिकांसाठी पथदिव्याची व्यवस्था नसल्याने त्वरीत पथदिवे लावण्याची मागणी नागरिकांनी ऊर्जामंत्री यांच्याकडे माहे जून, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने ग्रामीण रूग्णालयापर्यंत पथदिवे लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७) :**(१), (२) व (३) आंबेडकर चौक ते शासकीय ग्रामीण रुग्णालयापर्यंत एकूण ३१ पथदिवे आहेत. नादुरुस्त पथदिवे बदलण्याचे काम नगर पंचायत, आमगाव यांचेमार्फत करण्यात आले होते. सदर ३३१ पथदिव्यांपैकी १८ पथदिवे सुरळीत सुरु असून १३ पथदिवे अद्यापही नगर परिषद, आमगाव यांच्याकडून बदलण्यात आले नाहीत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विकास योजनेतील गैरव्यवहाराबाबत**

**(२७) ६५०८९ (१६-१२-२०१६). श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासींसाठी असलेल्या योजनांचा लाभ मध्यस्थ सरकारी यंत्रणा जनतेपर्यंत पोचू देत नसल्याने त्याबाबतची चौकशी करण्याची सूचना, मा.मुख्यमंत्र्यांनी, आयुक्त, आदिवासी विकास विभाग व सचिव, आदिवासी विकास विभागाला दिल्याचे दिनांक ९ ऑगस्ट, २०१६ रोजी जागतिक आदिवासी दिन व भारतरत्न डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम अमृत आहार योजना विस्तारीकरण व टप्पा दोनच्या शुभारंभ प्रसंगी निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यान्वये आयुक्त, आदिवासी विकास व सचिव आदिवासी विकास विभाग यांनी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले व त्यानुसार आदिवासी विकास विभागातील गैरव्यवहाराला पायबंद घालण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (२२-०८-२०१७) :**(१) हे खरे नाही. तर सदर कार्यक्रमामध्ये आदिवासींच्या योजना जनतेपर्यंत पोहेचविण्याची सूचना मा.मुख्यमंत्री महोदयांनी केली. शिवाय योजनांच्या समन्वय व संनियंत्रणाची व्यवस्था निर्माण करण्याबाबत सूचना केली.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्य मागासवर्गीय आयोगावर अध्यक्ष व समिती सदस्यांची नियुक्ती झाली नसल्याबाबत**

**(२८) ६५८४७ (१०-०१-२०१७). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य मागासवर्गीय आयोगावर माहे डिसेंबर, २०१४ नंतर अद्याप पर्यंत अध्यक्ष व समिती सदस्यांची नियुक्ती झाली नसल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) त्यामुळे, धनगर आरक्षणासह विविध ९३ प्रकारणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अद्यापपर्यंत समितीवर अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती न होण्याची काय कारणे आहेत व या नियुक्त्या कधीपर्यंत करण्यात येणार आहेत,

(४) तसेच, समितीकडे प्रलंबित असलेली प्रकरणे मार्गी लावण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (१९-०८-२०१७) :**(१) हे अंशतः खरे आहे.

शासन निर्णय दि.२१/१२/२०११ अन्वये राज्य मागासवर्ग आयोगाची पुनर्रचना करण्यात येऊन त्यावर अध्यक्ष, सहा सदस्य आणि एक समाजशास्त्रज्ञ यांची ३ वर्षाकरिता नियुक्ती करण्यात आली होती. दरम्यान मे,२०१२ मध्ये अध्यक्ष डॉ.बी.पी.सराफ यांचे निधन झाले व इतर ६ सदस्य व समाजशास्त्रज्ञ यांची मुदत दिनांक ३०/१२/२०१४ रोजी संपुष्टात आली. तथापि, शासन निर्णय दि.११/०२/२०१३ अन्वये श्री.जे.एच.भाटीया यांची अध्यक्ष म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांची मुदत दि.१०/०२/२०१६ रोजी संपुष्टात आली.

(२) अंशत: खरे आहे.

विविध संघटना व कार्यकर्त्यांची प्रकरणे प्रलंबित आहेत. धनगर आरक्षणासंदर्भात टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सेस, मुंबई यांच्याकडून संशोधन करण्यात येत असून अंतिम अहवाल डिसेंबर-२०१७ पर्यंत शासनास सादर होणार आहे.

(३) व (४) या विभागाच्या दि.०४/०१/२०१७ व दि.१०/०१/२०१७ रोजीच्या अधिसूचनेद्वारे राज्य मागासवर्ग आयोगावर नवीन अध्यक्ष व सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आयोगाच्या आयोजित बैठकीत सर्व प्रलंबित प्रकरणे विचारार्थ ठेवण्यात येणार आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग शाश्वत विकासासाठी करण्याबाबत**

**(२९) ६६१२७ (१६-१२-२०१६). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व), ॲड.आशिष शेलार (वांद्रे पश्चिम) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात नैसर्गिक साधनसंपत्ती विपूल प्रमाणात आहे याचा उपयोग शाश्वत विकासासाठी केला पाहिजे त्याचबरोबर कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना देणे आवश्यक असल्याचे मत मा.राज्यपाल यांनी एका परिषदेत व्यक्त केले असल्याचे माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मा.राज्यपाल यांनी व्यक्त केलेल्या मताची दखल घेत शासनाने राज्यात कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर (२१-०८-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.

(२) राष्ट्रीय अन्न प्रक्रिया अभियान ही योजना केंद्र शासनाने सन २०१५-१६ पासून बंद (Delinked) केली असून सदर योजना राज्य शासनाने सन २०१५-१६ या आर्थिक वर्षापासून बंद केलेली असून सदर योजना राज्य शासनाने महाराष्ट्र राज्यात चालू ठेवावी किंवा कसे याबाबत निर्णय घ्यावा असेही कळविलेले होते. त्यानुसार राज्याच्या अर्थसहाय्यातून राबविण्यात येणारी कृषि व अन्न प्रक्रिया ही नवीन योजना राज्यात राबविण्याबाबतचा धोरणात्मक निर्णयाचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. दिनांक ३०.०५.२०१७ रोजीच्या मंत्रिमंडळ बैठकीमध्ये "मुख्यमंत्री कृषि व अन्न प्रक्रिया योजना" राज्यात राबविण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्याबाबतचे शासन आदेश दिनांक २० जून, २०१७ रोजी काढण्यात आले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### साखरे (ता.विक्रमगड, जि.पालघर) या आश्रमशाळेतील विद्यार्थीनीचा झालेला मृत्यू

**(३०) ६६९५५ (२३-०१-२०१७). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) साखरे (ता.विक्रमगड, जि.पालघर) या आश्रमशाळेतील एका विद्यार्थीनीचा दिनांक ७ ऑक्टोबर, २०१६ रोजी उपचाराअभावी मृत्यू झाला तर अन्य विद्यार्थीनींवर नाशिक ग्रामीण रुग्णालयात तर काहींवर जव्हार ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार मुलींच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या आश्रमशाळेच्या संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०९-२०१७)** :(१) होय.

शासकीय आश्रमशाळा, साखरे, ता.विक्रमगड, जि.पालघर येथील कु.कौशल्या कुशा भरसट, इ.६ वी या विद्यार्थीनीचा दि.०७.१०.२०१६ रोजी विक्रमगड ग्रामीण रुग्णालय येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. कु.कमल सुरेश चौधरी, इ.९ वी या विद्यार्थीनीला जव्हार येथील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार पुढील उपचारासाठी नाशिक ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. तर काही विद्यार्थ्यांना जव्हार ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपचारानंतर सदर विद्यार्थ्यांनीना सोडण्यात आले.

(२) व (३) सदर घटनेच्या अनुषंगाने प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, जव्हार, जि.पालघर या कार्यालयातील सहाय्यक प्रकल्प (शिक्षक) व शिक्षण विस्तार अधिकारी यांच्यामार्फत चौकशी करुन, चौकशीअंती शासकीय माध्यमिक आश्रमशाळा साखरे,

ता.विक्रमगड, जि.पालघर येथील अधिक्षक यांना कर्तव्यात हलगर्जीपणा केल्याचे दिसून आल्याने निलंबित करण्यात आले आहे. तसेच माध्यमिक मुख्याध्यापक यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला (जि.अकोला) येथील दि इस्टर्न पॉवर कंपनीने शेतकऱ्यांच्या शेतात मनोरे उभे केल्याबाबत**

**(३१) ६९४७० (०७-०१-२०१७). श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अकोला (जि.अकोला) येथील दि इस्टर्न पॉवर कंपनी यांनी श्री.प्रल्हाद गणपत उन्हाळे, श्री.विजय प्रल्हाद उन्हाळे, नंदकिशोर प्रल्हाद उन्हाळे, शकुंतला प्रल्हाद उन्हाळे यांचे शेतात मनोरे उभे केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास या शेतकऱ्यांचे शासकीय व्हॅल्युअर नुसार ७२ लक्ष रूपये कंपनीकडून देणे आहे, परंतु सदर कंपनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना भरपाई देण्यास टाळाटाळ करत आहे, याबाबत कुटुंब प्रमुख यांनी ७२ लक्ष रूपये भरपाई देत नाही तोपर्यंत सदर कंपनीला ओ.पी.जी. तारेचे काम करू देण्यात येऊ नये, याबाबत दिनांक १०.३.२०१६ रोजी मा.जिल्हाधिकारी बुलढाणा यांना विनंती अर्ज केला होता, हे खरे आहे काय,

(३) तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई न देता सदर कंपनीने ओ.पी.जी. तारेचे काम केले असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती उन्हाळे कुटुंबियांना कंपनीकडून तातडीने नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (११-०९-२०१७) :**(१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र इस्टर्न ग्रिड ट्रान्समिशन कंपनीने अर्जदार यांना जमीनीचा मोबदला रु. ३७५२९/- व पिक नुकसानीचा रु. ३५,८७,२६५/- असे एकूण रु.३६,२४,७९४/- मोबदला दिलेला आहे. परंतु अर्जदार यांनी त्यांच्या दिनांक १०.०३.२०१६ च्या अर्जान्वये कंपनीने शेतातील झाडांचे व पिकांचे योग्य मुल्यांकन न करता मोबदला दिलेला असल्याने नियमानुसार योग्य ते मूल्यांकन करुन मोबदला मिळावा अशी विनंती केली आहे. त्यानुसार सदर अर्जाप्रमाणे कृषी अधिकारी यांच्याकडून चौकशी करण्यात आली . कृषी अधिकारी यांचे मूल्यांकन अहवाल मागवून अर्जदार यांना कंपनीने खालीलप्रमाणे मोबदला अदा करण्याचे आदेश उपविभागीय अधिकारी, खामगांव यांनी दिनांक ०९.११.२०१६ रोजी पारित केले आहेत.

१) देय होणारा मोबदला- रु. ९८,७८,९७५/-
२) (-) दिलेला मोबदला- रु. ३६,२४,७९४/-

एकूण फरकाची रक्कम रु. ६२,५४,१८१/- असून फरकाची रक्कम अदा करण्याबाबत कंपनीस आदेशित केलेले आहे. जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा यांच्या दिनांक १०.०७.२०१७ च्या अहवालानुसार महाराष्ट्र इस्टर्न ग्रिड ट्रान्समिशन कंपनीकडून फरकाची रक्कम अद्याप अदा केल्याचे दिसून येत नाही.

(४) उपविभागीय अधिकारी खामगांव यांनी चौकशी करुन नुकसान भरपाई देण्याबाबत आदेश पारित करुन कार्यवाही केलेली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**आदिवासी विभागातील आश्रमशाळेत वर्ग-३ व वर्ग-४ च्या कर्मचाऱ्यांना शासन सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्याबाबत**

**(३२) ६९९७० (११-०१-२०१७). श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विभागातील आश्रमशाळेत वर्ग-३ व वर्ग-४ चे सुमारे २ हजार २०० कर्मचारी मागील ५ ते १० वर्षांपासून तासिका व अल्प वेतनावर कार्यरत असून त्यांनी शासन सेवेत कायमस्वरुपी सामावून घेण्यासाठी अनेक आंदोलन, संप व पदयात्रा काढल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०९-२०१७) :**(१) होय.

मागील १० वर्षापासून आतापर्यंत शिक्षक तासिक तत्वावरील नेमलेले शिक्षक कर्मचाऱ्यांची संख्या ११६९ व शिक्षकेतर/रोजंदारी कर्मचाऱ्यांची संख्या ११३९ अशी असून, एकूण २३०८ रोजंदारी/तासिका तत्वावर कर्मचारी नियुक्त आहेत व त्यांचे मानधनात दि.०७.०६.२०१७ च्या आदेशान्वये वाढ केली आहे.

(२) शासकीय आदिवासी आश्रमशाळांमध्ये तासिका तत्वावरील पात्रता धारक शिक्षक कर्मचारी यांना नियमित भरती प्रक्रियेद्वारे गुणवत्तेनुसार सामावून घेण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**तळेगाव दाभाडे येथे महामार्गालगत वीज चोरी होत असल्याबाबत**

**(३३) ७२६०८ (१०-०१-२०१७). श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मावळ तालुक्यातील (जि.पुणे) जुन्या पुणे-मुंबई महामार्गालगत वडगाव माळीनगरमध्ये गेल्या अनेक महिन्यापासून परप्रांतीय कुटुंबीय अनधिकृत वास्तव्यास आहेत हे खरे आहे काय,
(२) असल्यास, हे परप्रांतीय कुटुंब भरदिवसा धोकादायकपणे वीज चोरी करून बल्ब व विद्युत उपकरणे वापरत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, महामार्गालगत असलेल्या या वीज चोरीबाबत परिसरातील नागरिकांनी तक्रार करूनही दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने याची चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले, त्यानुसार शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात आली, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७)** :(१), (२), (३) व (४) मावळ तालुक्यातील (जि.पुणे) जुन्या पुणे-मुंबई महामार्गालगत वडगांव माळीनगरमध्ये अनधिकृत वास्तव्यास असणारे परप्रांतीय कुटुंब भरदिवसा धोकादायकपणे वीजचोरी करुन बल्ब व विद्युत उपकरणे वापरीत असल्याबाबतची तक्रार सदर परिसरातील नागरिकांकडून प्राप्त झाल्यानंतर उपकार्यकारी अभियंता, वडगांव मावळ यांनी तपासणी केली असता अशा प्रकारची चोरी निदर्शनास आली नाही. सदर ठिकाणी वीजचोरी टाळण्यासाठी खबरदारीच्या उपाययोजना म्हणून तेथील अनधिकृत झोपडयांसमोरील लघुदाब वाहिनीच्या तेवढ्या मार्गाचा विद्युत प्रवाह बंद करुन ठेवण्यात आला आहे.

---

**राज्यातील शेतकऱ्यांचे सावकारी कर्ज माफ करण्याबाबत**

**(३४) ७४२९७ (२१-०४-२०१७). श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील परवानाधारक सावकारांनी त्यांच्या अधिकार क्षेत्राबाहेरच्या शेतकऱ्यांना दिलेले कर्ज शासन माफ करणार काय अशी विचारणा मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाने शासनाकडे केली असल्याची माहिती दिनांक २८ जानेवारी, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, नियमबाहय व कार्यक्षेत्राबाहेर कर्ज वाटप करणाऱ्या सावकारावर शासनाने कोणती कार्यवाही केली आहे व त्याचा तपशिल काय आहे,
(४) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०७-०९-२०१७)** :(१) होय.
(२) व (३) विदर्भ व मराठवाडयातील १२१५ सावकारांनी ६४४१६ शेतक-यांना रुपये ६२.९८ कोटी चे कार्यक्षेत्राबाहेर कर्ज वाटप केलेले आहे. त्यानुषंगाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येते.

जालना जिल्हयामधील संबंधीत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांनी सदर सावकारांना खुलासा सादर करण्याबाबत पत्रव्यवहार केला आहे.

तसेच नागपूर जिल्हातील उमरेड तालुक्यांतील ६ सावकारांनी कार्यक्षेत्राबाहेर कर्ज वाटप केल्याने संबंधीत सावकारांविरूध्द पोलीस स्टेशन, उमरेड येथे FIR दाखल करण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु सदर गुन्हा दाखल करता येत नसल्याची नोटीस सावकारांच्या वकिलाने दिल्याने पोलीस स्टेशन, उमरेड येथे गुन्हा दाखल झालेला नाही. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, उमरेड यांनी सदर प्रकरणाबाबत मा. शासकीय अभियोक्ता यांचेकडे अभिमत मागविले आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ नागपूर येथे जनहित याचिका क्रमांक ४३ /२०१६ अन्वये कार्यक्षेत्राबाहेरील कर्ज वाटपाबाबत प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील मागासवर्गीय मुलींसाठी ५० नवीन वसतीगृह सुरु करण्यासाठी जागा संपादित करण्याबाबत

**(३५) ७४२९८ (२१-०४-२०१७). श्री.मंगलप्रभात लोढा (मलबार हिल), श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.अजय चौधरी (शिवडी), डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ), श्री.पंकज भुजबळ (नांदगाव), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.चंद्रकांत सोनवणे (चोपडा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मागासवर्गीय मुलींसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षाच्या निमित्ताने ५० नवीन वसतीगृह सुरु करण्याच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने वसतीगृहांच्या शासकीय इमारतीसाठी जागा संपादित करण्यात आली आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत कोणत्या ठिकाणी सदर वसतीगृहे भाड्याच्या इमारतीत सुरु करण्यात आली आहेत,

(३) तसेच वसतीगृहातील मुलींच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक गृहपाल व इतर नियमित पदांना मान्यता देण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०५-०८-२०१७) :**(१) डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १२५ व्या जयंती वर्षानिमित्त मागासवर्गीय मुलींसाठी ५० वसतीगृहापैकी ७ ठिकाणी इमारत बांधकामासाठी जागा प्राप्त झालेली आहे, ठाणे येथे जमीन खरेदीबाबत कार्यवाही सुरु असुन ३ ठिकाणी इमारत बांधकामासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, त्याठिकाणी इमारत बांधकाम हाती घेण्याची पुढील कार्यवाही सुरु आहे. उर्वरित ३९ ठिकाणी सदर वसतीगृह भाडयाच्या जागेत चालविण्यात येत आहे.

(२) नाशिक, पुणे, अमरावती, औरंगाबाद, नागपूर, लातूर या ठिकाणी भाडयाच्या इमारतीत वसतीगृहे सुरु करण्यात आली आहेत.
(३) गृहपाल व इतर नियमित पदांना मान्यता देण्याची कार्यवाही सुरु आहे.
(४) या वसतीगृहांसाठी महिला कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्याबाबत सर्व प्रादेशिक उपायुक्त व संबंधित सहाय्यक आयुक्त यांना कळविण्यात आलेले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नाशिक येथे आदिवासी विभागाच्या आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना**
**स्वेटर मिळाले नसल्याबाबत**

**(३६) ७४६६७ (२८-०४-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.डी.एस.अहिरे (साक्री) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक येथे आदिवासी विभागाच्या आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना सलग दुस-या हिवाळ्यातही स्वेटर मिळाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच या आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांना आंघोळीसाठी गरम पाणी मिळत नसल्याने थंड पाण्याने आंघोळ करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी करुन या आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना स्वेटर पुरविणे, त्यांना आंघोळीसाठी गरम पाणी मिळावे यासाठी गिझरची व्यवस्था करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०९-२०१७) :**(१), (२), (३) व (४) शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना स्वेटर पुरविणेसाठी सन २०१५-१६ या शैक्षणिक सत्रात निविदा प्रक्रिया राबविण्यात आली होती. तथापि, सदर निविदेत तक्रारी प्राप्त झाल्याने सदरची निविदा रद्द करण्यात आली होती. सन २०१६-१७ या शैक्षणिक सत्रात स्वेटरसाठी शासकीय आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या/पालकांच्या बँक खात्यावर दि.१५/११/२०१७ रोजी स्वेटरची रक्कम वर्ग करण्यात आली आहे.

शासकीय आश्रमशाळेवर एकूण १०३२ सोलर वॉटर हिटर संच बसविण्यात आले आहेत. तथापि, काही संचाची तोडफोड झाल्याने व काही ठिकाणी सोलर कार्यान्वित करण्यात आलेले नसल्याने या प्रकरणाबाबत गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी दि.१६/४/२०१४ अन्वये विशेष चौकशी करण्यासाठी अन्वये विशेष चौकशी अधिकारी १, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांची चौकशी अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे. सदर प्रकरणी चौकशीची कार्यवाही सुरु असून चौकशी अहवाल अद्याप प्राप्त झालेला नाही.

---

**मौजे गारगांव (ता.वाडा, जि.पालघर) येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेला दिलेल्या जमिनीचा मोबदला अद्यापी न मिळाल्याबाबत**

**(३७) ७५६८२ (२८-०४-२०१७). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे गारगांव (ता.वाडा, जि.पालघर) येथील श्री.हरिश्चंद्र दत्तात्रय पाटील यांनी स्वत:च्या मालकीची सर्व्हे नं.१५०/१ मधील १ हेक्टर ३८ आर जमीन गारगाव येथील शासकीय आश्रमशाळेला दिली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, श्री.पाटील यांना सदर जागेसाठी प्रकल्पग्रस्तांना शासनाकडून मिळणारा मोबदला किंवा सोयीसुविधा अद्यापी मिळालेल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्त श्री.पाटील यांना शासनाकडून त्यांचा मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०७-०९-२०१७) :**(१) होय, हे खरे आहे.

शासकीय माध्यमिक आश्रमशाळा गारगाव, ता.वाडा, जि.पालघर येथील श्री.हरिचंद्र दत्तात्रय पाटील यांची भूमापन क्र.१५०/१ मधील १.०० हे.३८.१ आर, श्री.कांतीलाल रघुनाथ भानुशाली यांची भूमापन क्र.१५०/३ मधील १.०० हे. १९.०८ आर व श्री.लखु बळु पाटील यांची भूमापन क्र.१५३ मधील १.६ आर इतकी जमीन आश्रमशाळेकरिता बक्षिसपात्र/विनामुल्य स्वरुपात देण्याच्या अटीवर ताब्यात घेण्यात आली आहे.

(२) व (३) आश्रमशाळेकरिता जमीन बक्षिसपात्र/विनामुल्य स्वरुपात देण्यात आली आहे. त्यामुळे जमिनीचा मोबदला देण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही. सदर जमिनीच्या मोबदल्यामध्ये शासकीय इमारतीस जमीन मालकाचे नाव देणेबाबत अट घालण्यात आलेली होती. परंतु, शासकीय इमारतीस खाजगी व्यक्तीचे नाव देणे प्रयोजनामध्ये नसल्याने सदरची अट अमान्य करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील साखर कारखान्यांनी हंगाम २०१४-१५ मध्ये निर्यात केलेल्या कच्च्या साखरेस जाहीर केलेले अनुदान प्रलंबित असलेबाबत**

**(३८) ७६८०६ (२१-०४-२०१७). श्री.बबनराव शिंदे (माढा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्र सरकारने निर्धारित केलेली एफ.आर.पी. किमंत ऊस उत्पादक शेतक-यांना देणेकरीता मदत व्हावी म्हणून राज्य शासनाने राज्यातील सहकारी व खाजगी साखर कारखान्यांनी उत्पादित केलेल्या व हंगाम सन २०१४-१५ मध्ये निर्यात केलेल्या कच्च्या साखरेस प्रोत्साहनपर अनुदान प्रति मे.टन १००० रू देण्याचे धोरण दिनांक २३ जून, २०१५ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे निश्चित केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामध्ये सहकारी व खाजगी साखर कारखान्यांनी अनुदानाचे प्रस्ताव दाखल करूनही शासनाकडून अद्यापपर्यंत देय असलेले अनुदान संबधित कारखान्यांना दिलेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३)असल्यास, उक्त प्रकरणी शासनाकडून चौकशी केली आहे काय, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत, तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०७-०८-२०१७)** :(१) होय.
(२), (३) व (४) ९ सहकारी साखर कारखान्यांनी हंगाम २०१४-१५ मध्ये १५२६५६.४५ मे.टन कच्ची साखर निर्यात केलेली असून शासन निर्णय दि.२३.०६.२०१५ मधील तरतूदीनुसार रु.१०००/- प्रति मेट्रिक टन प्रमाणे सदर कारखान्यांना रुपये १५,२६,५६,४५०/- अनुदान अनुज्ञेय आहे.

तसेच ३ खाजगी साखर कारखान्यांनी हंगाम २०१४-१५ मध्ये २०८३४.१ मे.टन कच्ची साखर निर्यात केलेली असून शासन निर्णय दि.२३.०६.२०१५ मधील तरतूदीनुसार रु.१०००/- प्रति मेट्रीक टन प्रमाणे सदर कारखान्यांना रक्कम रुपये २,०८,३४,१००/- अनुदान अनुज्ञेय आहे.

आर्थिक वर्ष २०१७-१८ साठी एकूण रु.१०.०० कोटी तरतूद मंजूर आहे. वित्त विभागाच्या निर्देशाप्रमाणे त्यापैकी ७० % तरतूद रु.७.०० कोटी ही शासन निर्णय दि.११.०७.२०१७ अन्वये वितरित करण्यास मंजूरी दिली आहे.

---

**पालघर जिल्हयातील समुद्रालगतच्या गावांकरीता भुमिगत केबलद्वारे**
**वीज वितरण व्यवस्था करण्याची होत असलेली मागणी**

**(३९) ७८४१७ (२८-०४-२०१७). श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्हयातील समुद्रालगतच्या गावांकरीता केंद्र सरकार द्वारा पुरस्कृत राष्ट्रीय वादळ-भय उपशमन प्रकल्प योजने अंतर्गत भुमिगत केबलद्वारे वीज वितरण व्यवस्था करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २४ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्यासुमारास निवेदनाद्वारे मा.ऊर्जा मंत्री यांचेकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (१३-०९-२०१७)** :(१) हे खरे आहे.
(२) राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्प (NCRMP) अंतर्गत उपरी तारमार्ग भूमिगत करणे, रोहित्र उंच प्लिंथ वर बसविणे तसेच विद्युत ग्राहकांच्या सर्व्हीस वायर भूमिगत करणे इत्यादी कामांचा समावेश आहे. सदर योजनेअंतर्गत महाराष्ट्राच्या समुद्र किनारपट्टीलगतच्या चार जिल्ह्यांतील एकूण १२ ठिकाणे प्रस्तावित करण्यात आली होती. त्यामध्ये पालघर जिल्ह्यातील सातपाटी व वसई या शहरांचा समावेश होता.

या योजनेत महावितरण कंपनीअंतर्गत प्रदेशातील उपरी तारमार्ग भूमिगत करण्याच्या कामासाठी केंद्र शासनाने एकूण रु. २०० कोटीचा निधी मंजूर केलेला आहे. त्यानुसार जागतिक बँकेने प्रस्तावित १२ ठिकाणांपैकी रत्नागिरी (जि.रत्नागिरी), अलिबाग (जि.रायगड) व सातपाटी (जि.पालघर) या ठिकाणांची निवड केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात पुरेशा प्रमाणावर ऊस न मिळाल्याने ३८ टक्के साखर कारखाने बंद झाल्याबाबत**

**(४०) ७९६६२ (२१-०४-२०१७). श्री.किशोर पाटील (पाचोरा), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रातील जवळपास ३८ टक्के साखर कारखाने पुरेशा प्रमाणावर ऊस न मिळाल्याने बंद झाल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे राज्यात साखरेच्या उत्पादनात घट होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाची भूमिका काय आहे ?

**श्री. सुभाष देशमुख (०४-०९-२०१७) :**(१) होय.

(२) होय.

(३) सन २०१५-१६ च्या तुलनेत हंगाम २०१६-१७ मध्ये ऊस क्षेत्र ३.५४ लाख हेक्टरनी कमी झालेले असल्याने अपुऱ्या ऊस उपलब्धतेमुळे साखर कारखान्यांनी गाळप हंगाम कमी दिवसात पुर्ण केलेला आहे.

सन २०१७-१८ मध्ये ७२१.६० लाख टन ऊस उत्पादन होऊन निव्वळ गाळपासाठी ६५० लाख टन ऊस उपलब्धता अपेक्षित आहे. साखर उत्पादन ७३.४५ लाख टन होण्याचा प्राथमिक अंदाज आहे.

सुक्ष्म सिंचनामुळे पाण्याची बचत होण्याच्या दृष्टीने आणि शेतकऱ्यांच्या उत्पादन खर्चामध्येही बचत होऊन उत्पादन व उत्पादकतेत वाढ होण्याच्या दृष्टीने शासन निर्णय दि.२४.०७.२०१७ अन्वये ऊस पिकाखालील क्षेत्र सुक्ष्म सिंचनाखाली आणण्यासाठी नाबार्डमार्फत शेतकऱ्यांना ७.२५% व्याजाने कर्ज उपलब्ध करून देण्याची योजना मंजूर केली आहे. कर्जाच्या व्याजाच्या दायित्वाची विगतवारी राज्य शासन ४%, साखर कारखाने १.२५% व शेतकरी २% करण्यात आली आहे. सन २०१७-१८ या वर्षात १.५ लाख हेक्टर व सन २०१८-१९ या वर्षात १.५५ लाख हेक्टर या प्रमाणे एकूण ३.०५ लाख हेक्टर क्षेत्रावर योजना राबविण्यात येणार आहे.

---

**बहुजन क्रांती मोर्चा संयोजक समिती, चंद्रपूर जिल्हा संघटनेच्या वतीने मोर्चा काढल्याबाबत**

**(४१) ८००२१ (२१-०४-२०१७). श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बहुजन क्रांती मोर्चा संयोजक समिती, चंद्रपूर जिल्हा संघटनेच्या वतीने दिनांक १६ जानेवारी,२०१७ रोजी वा त्या सुमारास चंदपूर येथे मोर्चा काढण्यात आला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त समितीच्या मागण्यांचे स्वरूप काय आहे,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे व त्याचे स्वरूप काय आहे ?

**श्री. राजकुमार बडोले (१८-०८-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) सदर निवेदनकर्त्यांनी मा.राष्ट्रपती महोदयांचे नावाने निवेदन सादर केलेले असून सदर निवेदन जिल्हाधिकारी चंद्रपूर यांच्या कार्यालयाचे दि.१५/०२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये मा.राष्ट्रपती महोदय यांच्या कार्यालयास सादर केलेले आहे.
(३) सदर निवेदनातील विषय केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागांशी संबंधित आहेत. सदर निवेदनाची प्रत राज्य शासनाच्या संबंधित मंत्रालयीन विभागांना पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे.

---

## गडचिरोली जिल्ह्यात डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत

**(४२) ८०१८० (१८-०४-२०१७). डॉ.देवराव होळी (गडचिरोली) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी महिलाना प्रसूतिपूर्व आणि प्रसूती नंतर ताजा चौरस आहार नियमित देण्याबाबत डॉ. ए पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरू करण्यात आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी महिलांचे व मुलांचे आरोग्य सुदृढ राहावे या हेतूने सदर योजना कार्यान्वित करण्यात आली, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, गडचिरोली जिल्ह्यातील अधिकारी व कर्मचारी यांच्या उदासीनतेमुळे डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना आदिवासीपर्यंत पोहचल्या नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१८-०८-२०१७)** :(१) व (२) होय, हे खरे आहे.
अनूसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील गरोदर स्त्रीला बालकाच्या जन्मापूर्वी तीन महिने व स्तनदा मातेस पहिले तीन महिने एक वेळचा चौरस आहार देण्याची डॉ. ए पी जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना दिनांक १८ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये दि.१ डिसेंबर, २०१५ पासून सुरु करण्यात आली आहे. तदनंतर सदर एक वेळ चौरस आहार देण्याचा कालावधी स्त्री गरोदर असल्याचे निश्चित झाल्यापासून

बाळांतपणापर्यंत व स्तनदा मातांना पहिले सहा महिने एक वेळ चौरस आहार देण्याचा निर्णय दि.२ ऑगस्ट, २०१६ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला असून या योजनेचा शुभारंभ दि.९ ऑगस्ट, २०१६ या जागतिक आदिवासी दिनापासून करण्यात आला.

तसेच, अनूसूचित क्षेत्र व अतिरिक्त आदिवासी उपयोजना क्षेत्रातील ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना अंडी/केळी/स्थानिक फळे इत्यादीसह अतिरिक्त आहार पुरविण्यासाठी भारतरत्न डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना टप्पा-२ या योजनेस शासनाने दि.५ ऑगस्ट, २०१६ मान्यता दिलेली असून दि.९ ऑगस्ट, २०१६ या जागतिक आदिवासी दिनाचे औचित्य साधून योजनेचा शुभारंभ करण्यात आला.

(३) हे खरे नाही.

सदर योजना गडचिरोली जिल्हयातील १२ आदिवासी प्रकल्पांतील १८२९ अंगणवाडी केंद्रांमध्ये राबविण्यात येत आहे. त्यासाठी सन २०१६-१७ मध्ये रु. ११.२० कोटी खर्च करण्यात आले आहेत. गडचिरोली जिल्हयात मे, २०१७ मध्ये ६२४६ गरोदर स्त्रियांना, ४६५५ स्तनदा मातांना व ६०४३४ बालकांना सदर योजनेचा लाभ देण्यात आला आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्हयातील जात पडताळणी कार्यालयात पडताळणी अभावी प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत

**(४३) ८१००० (२१-०४-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्हयातील जात पडताळणी कार्यालयात हजारो जातपडताळणीचे प्रस्ताव पडताळणी अभावी पडून असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णयानुसार या कार्यालयात १ प्रमुख लिपीक, १ उच्च श्रेणी लघुलेखक, १ वरिष्ठ लिपीक, २ कनिष्ठ लिपीक व १ शिपाई असे एकूण ६ पदे देण्यात आली आहेत परंतु सांगली जात प्रमाणपत्र पडताळणी कार्यालयात एकच लिपीक आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,

(४) असल्यास, तद्नुसार जात पडताळणीचे प्रस्ताव तात्काळ निकाली काढण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (०३-०८-२०१७) :**(१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

तथापि, समितीचे कामकाज सुरळीत चालण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे मार्फत ८ इतके मनुष्यबळ करार तत्वावर तात्पुरत्या स्वरुपात उपलब्ध करून देण्यात आलेले आहे.

(३) अन्य जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती अधिकारी यांचेकडे सदर समितीचे अतिरिक्त कार्यभार दिलेले आहेत. तसेच महसूल व वन विभाग, शासन आदेश दि.२६/०७/२०१७ अन्वये सांगली समितीवर अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली आहे. रिक्त पदे तातडीने भरण्याची कार्यवाही चालू आहे.
(४) जात प्रमाणपत्र पडताळणी प्रकरणात त्रुटी असल्यास समितीकडून संबंधित अर्जदारास त्रुटी पूर्तता करणेबाबत कळविले जाते व अर्जदाराने योग्य त्रुटीपूर्तता केली असल्यास सदर नस्तीवर तात्काळ निर्णय घेण्यात येत असतो. तसेच प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्यासाठी संबंधित समितीच्या वतीने नियमितपणे विशेष मोहिमांचे आयोजन केले जात आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सांगली जिल्ह्यात महावितरणच्या ग्राहकांसाठी नवप्रकाश योजना सुरु करण्याबाबत**

**(४४) ८१०३६ (२८-०४-२०१७). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सांगली जिल्ह्यात महावितरणच्या ज्या ग्राहकांची वीज दिनांक ३१ मार्च, २०१६ पुर्वी कायमस्वरुपी बंद करण्यात आली होती अशा ग्राहकांसाठी नवप्रकाश योजना माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान लागू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेचा लाभ जिल्ह्यातील किती शेतक-यांनी घेतला आहे,
(३) असल्यास, ही योजना किती कालावधीकरीता राबविण्यात येणार आहे ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७) :**(१) महाराष्ट्रातील महावितरणच्या ज्या ग्राहकांचा वीज पुरवठा दि. ३१ मार्च, २०१६ पूर्वी कायमस्वरुपी बंद करण्यात आलेला आहे (सार्वजनिक पाणी पुरवठा वगळून) अशा ग्राहकांना थकबाकी भरणा करण्यासाठी नवप्रकाश योजना लागू करण्यात आली आहे.
(२) सांगली जिल्ह्यातील १०५ शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.
(३) ही योजना ऑगस्ट, २०१७ अखेर पर्यंत राबविण्यात येणार आहे.

---

**राज्यात संजय गांधी निराधार योजनेतून देण्यात येणारे अर्थसहाय्य अपूरे असल्याबाबत**

**(४५) ८१४५० (२१-०४-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात संजय गांधी निराधार योजनेतून देण्यात येणारे अर्थसहाय्य अत्यंत अपूरे असल्याने त्यामध्ये वाढ करण्याची मागणी सतत होत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या अर्थसहाय्यामध्ये वाढ करण्याचा धोरणात्मक निर्णय शासन घेणार आहे काय,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. राजकुमार बडोले (२१-०७-२०१७) :**(१) होय.

(२) व (३) सदर योजनेच्या लाभार्थ्यांच्या मासिक अनुदानात वाढ करण्याच्या प्रस्तावावर विचारविनिमय सुरू आहे.

---

**हिंगणघाट (जि.वर्धा) शहरातील आदिवासी वसतीगृह मंजूर असून जागेअभावी बांधकाम करण्यात आले नसल्याबाबत**

**(४६) ८१४५७ (२८-०४-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगणघाट (जि.वर्धा) शहरात आदिवासी वसतीगृह मंजूर असून जागेअभावी बांधकाम करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त वसतीगृहासाठी जागा उपलब्ध करण्यात आली आहे काय,त्यासाठी किती निधीची तरतूद केली आहे व किती कालावधीत वसतीगृहाचे बांधकाम पुर्ण करण्यात येणार आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (०४-०८-२०१७) :**(१) होय.

सन २०१२ मध्ये जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडून हिंगणघाट येथील आदिवासी मुलांच्या वसतिगृहासाठी उपलब्ध झालेल्या जागेवर अतिक्रमण असल्याने सदर ठिकाणी वसतिगृहाचे बांधकाम करण्यात आलेले नाही.

(२) जिल्हाधिकारी, वर्धा यांच्या दि. २९.०५.२०१७ च्या आदेशान्वये मौजा नांदगाव (बो) ता. हिंगणघाट, जि. वर्धा येथील शासकीय जमीन आदिवासी मुलांचे शासकीय वसतीगृह इमारत बांधकामास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, नागपूर यांना हस्तांतरीत करण्यात आली आहे. सदर जागेवर वसतीगृहाचे बांधकाम प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उत्कर्ष गृहनिर्माण संस्था, अंबरनाथ (पूर्व) या संस्थेच्या पदाधिका-यांनी सहकार कायद्याच्या तरतूदींचे उल्लंघन केले असल्याबाबत**

**(४७) ८१९३२ (२१-०४-२०१७). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उत्कर्ष गृहनिर्माण संस्था, अंबनाथ (पूर्व) या संस्थेच्या पदाधिका-यांनी सहकार कायद्याच्या अनेक तरतूदींचे उल्लंघन केल्याबाबत सन २०१५ पासून सहकार खात्याकडे तक्रारी करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू तक्रारींबाबत माहिती अधिकाराअंतर्गत माहिती मागविलेली असता कोणत्याही प्रकारची कागदपत्रे व माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू संस्थेच्या पदाधिका-यांनी सहकार कायद्याअंतर्गत केलेल्या तरतूदींचे उल्लंघन केल्याबाबत कोणती कारवाई केली वी करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देशमुख (०४-०८-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
जनमाहिती अधिकाऱ्याने अर्जदारास वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिली आहे.
(३) सदर संस्थेच्या व्यवस्थापकीय समितीच्या पदाधिकाऱ्यांविरुध्द महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० च्या कलम ७८(१) अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून, सद्य:स्थितीत सदर संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**परभणी जिल्ह्यातील ग्रामीण भागात वीज पुरवठा करणा-या महावितरणच्या १० उपविभागांतर्गत असलेल्या विद्युत रोहित्रांच्या दुरावस्थेबाबत**

**(४८) ८३९८१ (२८-०४-२०१७). डॉ.राहूल पाटील (परभणी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) परभणी जिल्ह्यातील ग्रामीण भागात वीज पुरवठा करणाऱ्या महावितरणच्या १० उपविभागांतर्गत असलेल्या विद्युत रोहित्रांच्या किटकॅट बॉक्सची अत्यंत दुरावस्था झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, ग्रामीण भागातील नागरिकांना विद्युत रोहित्रांच्या दुरावस्थेतमुळे जिवितास धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर रोहित्रांच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (२४-०८-२०१७)** :(१), (२) व (३) ग्रामीण भागातील एकूण १०११८ रोहित्रांना बसविलेल्या किटकॅट बॉक्स पैकी ८५० बॉक्स खराब झाल्याचे आढळून आले. त्यापैकी Upgradation & Modernisation (U/M) या योजनेअंतर्गत १६० किटकॅट बॉक्स बदली करण्यात आले असून १२५ खराब झालेले किटकॅट बॉक्स महावितरण कंपनीमार्फत बदली अथवा दुरुस्त करण्यात आलेले असून उर्वरित ५६५ खराब झालेले किटकॅट बॉक्स दुरुस्ती/बदलविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

---

**राज्यातील आश्रमशाळांना संरक्षण भिंत नसल्याबाबत**

**(४९) ८४२३७ (२८-०४-२०१७). श्री.राजन साळवी (राजापूर), ॲड.भीमराव धोंडे (आष्टी), श्री.सुनिल शिंदे (वरळी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शिक्षण हक्क कायद्यानुसार आणि आश्रमशाळा संहितेनुसार प्रत्येक आश्रमशाळेस सुसज्ज व भक्कम संरक्षण भिंत असणे आवश्यक असतानाही राज्यातील बहुतांश आश्रमशाळांना संरक्षण भिंत नसल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने राज्यातील आश्रमशाळांची पाहणी केली आहे काय;

(३) असल्यास, सदर पाहणीत काय आढळून आले आहे आणि राज्यातील सर्व आश्रमशाळांत सुसज्ज व भक्कम संरक्षक भिंत उभारण्याबाबत शासनाकडून कोणती ठोस कार्यवाही करण्यात आली वा येत आहे;

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विष्णु सवरा (१२-०९-२०१७) :**(१), (२) व (३) राज्यात एकूण ५५२ शासकीय आश्रमशाळा असून ५०६ कार्यरत आहेत, त्यापैकी आश्रमशाळांना संरक्षण भिंत आहे, १४६ आश्रमशाळांना संरक्षक भिंत नाही. संरक्षण भिंत नसलेल्या ८२ आश्रमशाळांसाठी संरक्षण भिंत बांधणेसाठी कार्यवाही सुरु आहे. उर्वरित आश्रमशाळा संरक्षक भिंत बांधकाम हाती घेण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नाशिक जिल्हयात राज्य उत्पादन शुल्क विभागाने येवला-मनमाड रस्त्यावर अवैध मद्य साठा पकडल्याबाबत**

**(५०) ९०४२६ (०९-०८-२०१७). श्री.पंकज भुजबळ (नांदगाव) :** सन्माननीय **राज्य उत्पादन शुल्क मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक जिल्हयात राज्य उत्पादन शुल्क विभागाने मध्य रात्रीच्या सुमारास येवला-मनमाड रस्त्यावर सावरगांवजवळ परराज्यातुन नाशिककडे जाणा-या अवैध मद्य साठ्यावर दिनांक १० जून, २०१७ रोजी वा त्यासुमारास कारवाई केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे,

(३) असल्यास, चौकशी अहवालानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे (०८-०९-२०१७)** :(१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) होय.

सदर गुन्ह्यात आयशर ट्रक क्र. MH१५-EG-७८८९ मधून हरियाणा राज्य निर्मित भारतीय बनावटीचे विदेशी मद्याचे ७५०मि.ली. क्षमतेचे ३०२ बॉक्सची वाहतूक होत असताना पकडण्यात आलेला आहे. त्यामुळे संबंधिताविरुध्द महाराष्ट्र दारुबंदी कायदा, १९४९ अन्वये गु.रजि.क्र. २४२/२०१७, दि.०९/०६/२०१७ गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाची किंमत रु.४१,५७,७५०/- अशी आहे. वाहन चालकास अटक करण्यात आलेली आहे. सदर प्रकरणाचा तपास सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

___________

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, नागपूर.